# राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यावर जनमत घेऊन निर्णय घेतला जाऊ शकतो का?

अरुण जेटली
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

आम आदमी पक्षाच्या एका वरिष्ठ नेत्याने असे मत व्यक्त केले आहे की, काश्मीर खो-यात लागू असलेल्या लष्कराचा विशेष अधिकार कायदा लागू करण्याबाबत जनमत घेऊन निर्णय घ्यावा. याच नेत्याने नागरिकांची मागणी असेल तर जम्मू-काश्मीरला स्वातंत्र्य देण्याचे मत व्यक्त केले होते.

देशातील हिस्स्यांच्या एकीकरणाचे काम सरदार पटेल यांनी केले होते. मात्र त्यात एक अपवाद होता. वास्तविक पाहता जम्मू-काश्मीरशी संबंधित मुद्द्यांसंदर्भात पंडित जवाहरलाल नेहरु यांनी निर्णय घेतले होते. जम्मू-काश्मीर संदर्भात त्यांच्या कुप्रबंधांचा परिणाम आजही आपल्याला सहन करावा लागत आहे. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देण्याव्यतिरिक्त, तेथील लोकांच्या इच्छांकडे लक्ष देण्याचा विचार नेहरु यांचा होता. हा फॉर्मूला देशातील अन्य हिश्श्यांमध्ये लागू नव्हता, जे भारताचे हिस्से बनले.

जनमत घेण्याचा मुद्दा, ज्याचे पाकिस्तानने आंतरराष्ट्रीयीकरण केले, पाकिस्तानद्वारे चुकीच्या पद्धतीने कब्जा केल्या गेलेल्या क्षेत्राशी जोडला गेला. आज जनमत घेण्याचा मुद्दा हा आंतरराष्ट्रीय अजेंड्याचा हिस्सा नाही आणि संयुक्त राष्ट्र प्रक्रियेत देखील नाही तसेच भारत-पाक द्विपक्षीय बातचीतचा ही तो मुद्दा नाही.

भारताची रक्षा ही पूर्णपणे केंद्र सरकारच्या अधिकार क्षेत्राचा विषय आहे. हा राज्याचा विषय नाही किंवा याला स्थानीय पातळीवर सोडवू शकत नाही. भारतातील हिश्शांचे रक्षण करणे ही केंद्र सरकारची मुख्य जबाबदारी आहे. भारतीय राज्याची मुख्य चिंता आपली प्रभुसत्ता आणि अखंडता यांचे रक्षण करणे आहे. विभाजनावेळेपासूनच काश्मीर पाकिस्तानच्या अर्धवट अजेंड्यात आहे. ही गोष्ट पाकिस्तानच्या कधीच पचनी पडली नाही की काश्मीर हा भारताचा हिस्सा आहे. या मुद्द्याचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याचा पाकचा प्रयत्न असफल झाला. गेल्या 25 वर्षांच्या युद्धात दोन परंपरागत युद्धांत पराजित झाल्यानंतर पाकने सीमेपलिकडून दहशतवादाच्या माध्यमातून छुपे युद्ध छेडले आहे. भटकलेल्या तरुणांचे स्थानिय दहशतवादी मॉड्यूल पण त्यात शामील आहेत.

भाजपा श्री अटलबिहारी वाजपेयी यांच्या या घोषणेशी वचनबद्ध आहे की सर्व मुद्द्यांचे समाधान माणूसकीतून काढले जाईल. याच धारणेतून दहशतवाद नष्ट होईल, दहशतवादाचा पाया ढासळला जाईल आणि जम्मू-काश्मीरच्या जनतेला सुख-सुविधा, शांती आणि चांगले जीवन मिळेल. जम्मू-काश्मीर खोरे आणि तेथील जनतेचे रक्षण करण्यासाठी लष्कर तिथे आवश्यक आहे.

खो-यातील लष्कराला हटविण्याची सूचना पाकिस्तानची आहे. काही वेगळे गट पाकिस्तानच्या या मागणीसाठी त्याच्या सूरात सूर मिसळत आहे. खेदजन्य बाब अशी की, आम आदमी सारखी पार्टी, ज्यांनी राष्ट्रीय महत्त्वांकांक्षेला बढावा दिला, त्यांनी असे कृत्य केले की जे भारताच्या हितांना प्रतिकूल आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यावर कोणताही निर्णय लोकप्रियता किंवा जनमत घेऊन केला जाऊ शकत नाही. यासंदर्भातील कोणताही निर्णय सुरक्षेला लक्षात घेऊन मगच केला जाऊ शकतो. जोपर्यंत दहशतवादाचा पाया मजबूत आहे तोपर्यंत जम्मू-काश्मीर मध्ये लष्कराची उपस्थिती आवश्यक आहे.

यामूळे माझ्या डोक्यात एकच गोष्ट येते- काही विशेष परिस्थितीत राजकिय पक्ष जे पावसाळ्यातील बेडकांसारखे निर्माण होतात, त्यांची काही विचारधारा असूच शकत नाही. पक्ष जस जसा वाढतो तस तशी त्यांची विचारधारा बनत जाते. त्यामुळे शर्ती येतात आणि गंभीर चिंता उत्पन्न होते. विभिन्न मुद्द्यांवर आम आदमी पक्षाची वैचारिक स्थिती स्पष्ट होत नाही. निवडणुकांनंतरच त्यांच्या नेत्यांकडून आरंभिक संकेत मिळत आहेत की, विमानतळ आणि प्राकृतिक संसाधनांचे राष्ट्रीयीकरण करावे. भारताच्या सुरक्षेवर त्यांची भूमिका नरम आणि कमकुवत आहे. ते अधिक सबसिडीचे समर्थन करतात ज्यासाठी अधिक कर लावण्याची गरज आहे. गेल्या 10 दिवसांपासून शेख चिल्ली सारखे वक्तव्य केले जात आहे आणि कोणतेही ठोस मत देण्यात आले नाही आहे. मला आशा आहे की आप मध्ये असलेल्या समंजस लोकांनी ही भूमिका बदलावी, अन्यथा हा पक्ष ज्या वेगाने वर गेला आहे, त्यापेक्षा अधिक वेगाने खाली येईल.